# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- *jtdirrom@gmail.com* website – *www.jdteromumbai.com*


परिपत्रक
अतितात्काळ

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/ २८०६

दिनांक : 21 AUG 2018

प्रति,
प्राचार्य,
सोबत जोडलेल्या यादीतील संस्था

विषय : राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८
सन २०१७-१८ व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांची देय असणारी शिष्यवृत्ती रक्कम (बॅच-४चे वाटप) संबंधित महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शैक्षणिक संस्थांना थेट स्वरुपात अदा करणे.

संदर्भ : १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२०८/तांशि-४, दि. २१/०६/२०१८
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे का.आ. क्र. १८/अर्थसं/इबीसी/वितरण/२०१७-१८/२८२, दि. ०६/०८/२०१८
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/२४३६, दि. १६/०७/२०१८

सोबत जोडलेल्या यादीतील संस्थांना कळविण्यांत येते की आपल्या संस्थेच्या नावासमोर दर्शविलेली बॅच-४ मधील विद्यार्थ्यांची रक्कम संदर्भीय क्र.२च्या कार्यालयीन आदेशान्वे प्राप्त झालेली आहे. संदर्भीय क्र. १चा शासन निर्णय सर्व संस्थांच्या माहितीसाठी सोबत जोडण्यांत येत आहे सदर शासन निर्णयातील निर्देशानुसार शासन निर्णयासोबत दिलेल्या "परिशिष्ट-अ" अन्वये बंधपत्र संस्थेच्या लेटर हेडवर सादर करायचे आहे.

तसेच संस्थेच्या बँक खात्यावर सदर रक्कम वर्ग करण्याकरिता आवश्यक असलेली खालील कागदपत्रे संस्थेने सादर करणे अनिवार्य आहे.

१. **<u>संस्थेच्या लेटर हेडवर</u> हमीपत्र व प्री-ॲडव्हान्स रिसिट** (ॲडव्हान्स स्टॅंप रिसिटवर रिव्हेन्यू स्टॅंप लावून त्यावर प्राचार्यांची स्वाक्षरी घेणे अनिवार्य आहे.)
२. **एन.ई.एफ.टी. फॉर्म**
३. **<u>संस्थेच्या लेटर हेडवर</u> संदर्भीय क्र.१च्या शासन निर्णयासोबत दिलेल्या "परिशिष्ट-अ" अन्वये बंधपत्र**
४. **बॅच-४ मधील विद्यार्थ्यांची यादी (डिटीईच्या ईबीसी पोर्टलच्या मेसेज बॉक्समध्ये पाठविलेली.)**

वरील सर्व कागदपत्रे तात्काळ सादर करायची आहेत. ज्या विद्यार्थ्यांना सदर रक्कम अदा करावयाची आहे त्याची यादी डीटीईच्या संकेतस्थळावरील ईबीसी पोर्टलच्या मेसेज बॉक्सद्वारे पाठविण्यांत येत आहे त्या यादीतील नमूद विद्यार्थ्यांना त्यांची शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम अदा करावयाची आहे. तसेच हमीपत्रात नमूद केलेल्या विहीत कालावधीत उपयोगिता प्रमाणपत्र ह्या कार्यालयास सादर करायचे आहे. हे वाटप होण्याआधी बॅच-१ व बॅच-२ अन्वये डिबीटी प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या आधार लिंक खात्यामध्ये त्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यांत आलेली आहे व त्याची यादी ईबीसी पोर्टलवर प्रसारित करण्यांत आलेली आहे. संदर्भीय क्र.१च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार संदर्भांकीत क्र.३च्या परिपत्रकान्वये बॅच-३ मधील विद्यार्थ्यांचे वाटप करण्याचे अनुषंगाने याआधीच परिपत्रक निर्गमित करण्यांत आलेले आहे. बॅच-३च्या वाटप करावयाच्या संस्थांमधील अजूनही काही संस्थांनी

त्यांची वरील अनुषंगिक कागदपत्रे सादर केलेली नाहीत. ही बाब अत्यंत गंभिर आहे. ज्यांनी अद्याप बॅच-३ करिता कळविलेल्या रकमेच्या प्री-ॲडव्हान्स रिसिट तसेच इतर अनुषंगिक कागदपत्रे सादर केलेली नसतील त्यांनी तात्काळ ती सादर करावीत. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी संदर्भीय क्र. २ अन्वये निर्देश दिलेले असल्याने त्यानुसार सदरचे वाटप अत्यंत तात्काळ करण्यांत येणार आहे. याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

**विशेष सूचना :** संदर्भीय क्र.३ च्या परिपत्रकान्वये बॅच-३ मधील विद्यार्थ्यांकरिता व सदर परिपत्रकातील बॅच-४ मधील विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्रपणे परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली कागदपत्रे सादर करावयाची आहेत. दोन्ही बॅच करिता एकत्रितपणे कागदपत्रे सादर करु नयेत. ज्यांनी अद्यापही बॅच-३ करिताची कागदपत्रे सादर केलेली नाहीत. अशा संस्थांना सूचित करण्यांत येते की, दोन्ही बॅचची स्वतंत्रपणे कागदपत्रे सादर करतांना प्री-ॲडव्हान्स रिसिटीवर त्या त्या बॅचचे क्रमांक नमूद करावेत.

(जे.आर. निखाडे)
सहाय्यक संचालक (तां.),
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

सहपत्रे : वरीलप्रमाणे

प्रत माहितीसाठी :
लेखा विभाग, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

## : अत्यंत महत्त्वाच्या सूचना :

१. या कार्यालयामार्फत बॅच-३ करिता दि. १६/०७/२०१८ व बॅच-४ करिताचे हे दि. २१/०८/२०१८ चे परिपत्रक काळजीपूर्वक वाचावे.

२. दोन्ही बॅच करिता या परिपत्रकातील परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केलेली कागदपत्रे स्वतंत्रपणे जोडावीत. कोणत्याही परिस्थितीत दोन्ही बॅचकरिता एकत्रित प्री-ॲडव्हान्स रिसिट व इतर अनुषंगिक कागदपत्रे एकत्रित करुन जोडू नयेत.

३. प्री-ॲडव्हान्स स्टँप रिसिटवर रिव्हेन्यू स्टँप लावून त्यावर प्राचार्यांची स्वाक्षरी घेणे अनिवार्य असूनही काही संस्था याबाबत रिव्हेन्यू स्टॅम्प न चिकटवताच केवळ प्राचार्यांची स्वाक्षरी घेऊन स्टॅम्प रिसिट सादर करीत आहेत. हे चूकीचे आहे.

४. बॅच-१ व बॅच-२ मध्ये वाटप केलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमा विद्यार्थ्यांच्या आधरशी लिंक असलेल्या खात्यामध्ये जमा केल्याचे तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या (म्हणजेच डीटीईच्या) आयटी सेल कडून कळले आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या रकमा तांत्रिक कारणास्तव परत आल्यात (म्हणजेच रिव्हर्ट झाल्यात) अशा विद्यार्थ्यांची यादी याआधीच संस्थांना डिटीईमार्फत पाठविण्यांत आली आहे. तसेच सदर यादी ईबीसी पोर्टलवर उजवीकडील नोटीफिकेशनमधील स्क्रोल होणाऱ्या यादीमध्ये सर्वात शेवटी **More..** ह्या ऑप्शनला क्लिक केल्यावर आपणांस प्राप्त होऊ शकते. तसेच सदर ऑप्शनमध्येच बॅच-२ मध्ये वाटप केलेल्या विद्यार्थ्यांची यादीही उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. संस्थांनी सुलभ संदर्भासाठी सदर याद्या आपल्याकडे डाऊनलोड करुन घ्याव्यात. त्याकरिता या कार्यालयाकडे वारंवार विचारण करु नये.

५. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार ज्या विद्यार्थ्यांची रक्कम रिव्हर्ट झाली आहे. अशा विद्यार्थ्यांची रक्कम लवकरात लवकर देण्याची कार्यवाही चालू असल्याबाबत कळविले आहे. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्याकडून त्याबाबतचे परिपत्रक प्राप्त होताच संस्थांना परिपत्रकाद्वारे सूचित केले जाईल.

६. ज्या संस्थांनी बॅच-३ करिता एन.ई.एफ.टी. फॉर्म याआधीच सादर केले आहेत. त्यांनी सदर फॉर्मसची प्राचार्यांनी साक्षांकीत केलेली प्रत बॅच-४ च्या कागदपत्रांसोबत जोडल्यास हरकत नाही. परंतु कोणत्याही परिस्थितीत सदर प्रत साक्षांकीत म्हणजेच Attested करुनच जोडावी. बऱ्याच संस्था केवळ छायांकीत प्रत जोडून सादर करतात. हे पूर्णतः चूकीचे आहे.

७. असे निदर्शनास आले आहे की, या कार्यालयामार्फत निर्गमित होणारी परिपत्रके संस्थेचे संबंधीत अधिकारी/प्रतिनिधी काळजीपूर्वक न वाचता पुनःपुन्हा तेच तेच प्रश्न विचारत राहतात. उदा. : परिशिष्ट अ चे बंधपत्र लेटरहेडवर द्यावे. हे नमूद करुनही रु. १००/- च्या स्टँप पेपरवर द्यावे का ? अशी सतत विचारणा या कार्यालयाकडे केली जात आहे. त्यामुळे दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्वांनी कार्यवाही करावी.

# Joint Director, Technical Education, Regional Office, Mumbai

A.Y. 2017-18 EBC : Approved & Sanctioned Amt. List of following Institutes (Batch-4)

| Sr.No. | Institute Code | Institute Name | Total Fee To Be Reimburse |
|---|---|---|---|
| 1 | 3005 | Government College of Pharmacy, Ratnagiri | 59500 |
| 2 | 3007 | Government Polytechnic, Mumbai | 6920 |
| 3 | 3008 | Government Polytechnic, Pen | 30150 |
| 4 | 3009 | Government Polytechnic, Ratnagiri | 57900 |
| 5 | 3010 | Government Polytechnic, Malvan | 258675 |
| 6 | 3011 | Government Polytechnic, Thane | 52800 |
| 7 | 3012 | Veermata Jijabai Technological Institute(VJTI), Matunga, Mumbai | 137525 |
| 8 | 3016 | Bombay College of Pharmacy, Santacruz(E), Mumbai | 27500 |
| 9 | 3017 | C U Shah College of Pharmacy for Women, Mumbai | 23500 |
| 10 | 3018 | Rachna Sansad Academy Of Architecture,Mumbai | 61050 |
| 11 | 3021 | K. J. Somaiya Polytechnic, Mumbai | 128350 |
| 12 | 3023 | St. Xavier's Technical Institute, Mumbai | 7200 |
| 13 | 3025 | Shri Bhagubhai Mafatlal Polytechnic, Mumbai | 211492 |
| 14 | 3033 | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 392850 |
| 15 | 3040 | Dr. Babasaheb Ambedkar Tech.University,Institute of Petrochemical Engineering,Lonere,Raigad | 87650 |
| 16 | 3103 | K. J. Somaiya Institute of Management Studies & Research, Mumbai | 454095 |
| 17 | 3109 | S.I.E.S. College of Management Studies, Mumbai | 53982 |
| 18 | 3125 | Audyogik Shikshan Mandal's Institute of Management & Computer Studies, Thane | 435829 |
| 19 | 3127 | NCRD's Sterling Institute of Management Studies, Navi Mumbai | 170890 |
| 20 | 3132 | Dr. G D Pol Foundation YMT College of Management, Navi Mumbai | 415800 |
| 21 | 3135 | Manjara Charitable Trust's Rajiv Gandhi Institute of Technology, Mumbai | 1107724 |

| Sr.No. | Institute Code | Institute Name | Total Fee To Be Reimburse |
|---|---|---|---|
| 22 | 3139 | Vidyalankar Institute of Technology,Wadala, Mumbai | 4393591 |
| 23 | 3142 | Navjeevan Education Society's Polytechnic, Mumbai | 362336 |
| 24 | 3143 | Zagdu Singh Charitable Trust's Thakur Polytechnic, Mumbai | 848610 |
| 25 | 3144 | Mahavir Education Trust's Shah & Anchor Kutchhi Polytechnic, Mumbai | 636065 |
| 26 | 3145 | Vivekanand Education Society's Polytechnic, Mumbai | 1757359 |
| 27 | 3146 | Jawahar Education Society's Annasaheb Chudaman Patil College of Engineering,Kharghar | 4401245 |
| 28 | 3147 | Saraswati Education Society, Yadavrao Tasgaonkar Institute of Engineering & Technology, Karjat | 2132093 |
| 29 | 3148 | Mahavir Education Trust's Shah & Anchor Kutchhi Engineering College, Mumbai | 3613542 |
| 30 | 3154 | Saraswati Education Society's Saraswati College of Engineering,Kharghar Navi Mumbai | 2760196 |
| 31 | 3162 | Bharti Vidyapeeth's Institute of Management & Information Technology, Navi Mumbai | 438282 |
| 32 | 3167 | Mumbai Education Trust's Institute of Computer Science, Bandra (W), Mumbai | 129974 |
| 33 | 3168 | Thakur Institute of Management Studies Career Development Research, Kandivali (E), Mumbai | 1214114 |
| 34 | 3173 | Deccan Education Society's Navinchandra Mehta Institute of Technology & Development, Dadar, Mumbai | 233800 |
| 35 | 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Institute of Tech., Navi Mumbai | 3397187 |
| 36 | 3175 | M.G.M.'s College of Engineering and Technology, Kamothe, Navi Mumbai | 3835143 |
| 37 | 3176 | Thakur College of Engineering and Technology, Kandivali, Mumbai | 3512884 |
| 38 | 3181 | K.J.Somaiya College of Engineering, Vidyavihar, Mumbai | 5251000 |
| 39 | 3182 | Thadomal Shahani Engineering College, Bandra, Mumbai | 3706884 |
| 40 | 3183 | Anjuman-I-Islam's M.H. Saboo Siddik College of Engineering, Byculla, Mumbai | 1834208 |

| Sr.No. | Institute Code | Institute Name | Total Fee To Be Reimburse |
|---|---|---|---|
| 41 | 3184 | Fr. Conceicao Rodrigues College of Engineering, Bandra,Mumbai | 252184 |
| 42 | 3185 | Vivekanand Education Society's Institute of Technology, Chembur, Mumbai | 6434049 |
| 43 | 3187 | N.Y.S.S.'s Datta Meghe College of Engineering, Airoli, Navi Mumbai | 2686134 |
| 44 | 3188 | Padmabhushan Vasantdada Patil Pratishthans College of Engineering, Sion,Mumbai | 4525938 |
| 45 | 3189 | Bharati Vidyapeeth College of Engineering, Belpada, Kharghar, Navi Mumbai | 2151654 |
| 46 | 3190 | Terna Engineering College, Nerul, Navi Mumbai | 2572851 |
| 47 | 3191 | Mandar Education Society's Rajaram Shinde College of Engineering, Pedhambe | 384312 |
| 48 | 3192 | Smt. Indira Gandhi College of Engineering,Kopar Khairane, Navi Mumbai | 748814 |
| 49 | 3193 | Shivajirao S. Jondhale College of Engineering, Dombivali,Mumbai | 2552805 |
| 50 | 3194 | Vidyavardhini's College of Engineering and Technology, Vasai, Thane | 1229498 |
| 51 | 3196 | Lokmanya Tilak College of Engineering, Kopar Khairane, Navi Mumbai | 7890775 |
| 52 | 3197 | Agnel Charities' FR. C. Rodrigues Institute of Technology, Vashi, Navi Mumbai | 1619142 |
| 53 | 3198 | Konkan Gyanpeeth College of Engineering, Karjat | 1623660 |
| 54 | 3199 | Shri Vile Parle Kelvani Mandal's Dwarkadas J. Sanghvi College of Engineering, Vile Parle,Mumbai | 2278822 |
| 55 | 3200 | Hope Foundation and research center's Finolex Academy of Management and Technology, Ratnagiri | 1726607 |
| 56 | 3201 | Rizvi Education Society's Rizvi College of Engineering, Bandra,Mumbai | 1026571 |
| 57 | 3202 | Rajendra Mane College of Engineering & Technology Ambav Deorukh | 1647136 |
| 58 | 3203 | Atharva College of Engineering,Malad(West),Mumbai | 1217305 |
| 59 | 3204 | St. Francis Institute of Technology,Borivali, Mumbai | 615075 |
| 60 | 3205 | Bharati Vidyapeeth College of Pharmacy, Belapur, Navi Mumbai | 129072 |

| Sr.No. | Institute Code | Institute Name | Total Fee To Be Reimburse |
|---|---|---|---|
| 61 | 3206 | S.S.P.M.'s College of Engineering, Kankavli | 2307995 |
| 62 | 3207 | M.E.S Pillai's Institute of Information Technology, Engineering Media Studies and Research,New Panvel | 5901095 |
| 63 | 3208 | Don Bosco Institute of Technology, Mumbai | 972165 |
| 64 | 3209 | K J Somaiya Institute of Engineering and Information Technology, Sion, Mumbai | 1917828 |
| 65 | 3210 | Excelsior Education Society's K.C. College of Engineering and Management Studies and Research, Kopri, Thane (E) | 2228906 |
| 66 | 3211 | S.I.E.S. Graduate School of Technology, Nerul, Navi Mumbai | 1932617 |
| 67 | 3212 | Watumull Institute of Electronics Engineering and Computer Technology, Worli, Mumbai | 715646 |
| 68 | 3214 | Xavier Institute Of Engineering C/O Xavier Technical Institute,Mahim,Mumbai | 1112180 |
| 69 | 3215 | Bhartiya Vidya Bhavan's Sardar Patel Institute of Technology , Andheri, Mumbai | 855685 |
| 70 | 3216 | Gharda Foundation's Gharda Institute of Technology,Khed, Ratnagiri | 1763000 |
| 71 | 3217 | Vighnaharata Trust's Shivajirao S. Jondhale College of Engineering & Technology, Shahapur, Asangaon, Dist Thane | 1433738 |
| 72 | 3218 | Aldel Education Trust's St. John College of Engineering & Management, Vevoor, Palghar | 1838225 |
| 73 | 3219 | Koti Vidya Charitable Trust's Smt. Alamuri Ratnamala Institute of Engineering and Technology, Sapgaon, Tal. Shahapur | 3699540 |
| 74 | 3220 | Saraswati Education Society, Yadavrao Tasgaonkar College of Engineering and Management, Nasarapur, Chandai, Karjat | 1670235 |
| 75 | 3221 | Late Shri. Vishnu Waman Thakur Charitable Trust, Viva Institute of Technology, Shirgaon | 1802265 |
| 76 | 3222 | Haji Jamaluddin Thim Trust's Theem College of Engineering, At. Villege Betegaon, Boisar | 1712294 |
| 77 | 3223 | Mahatma Education Society's Pillai HOC College of Engineering & Technology, Tal. Khalapur. Dist. Raigad | 10950855 |

| Sr.No. | Institute Code | Institute Name | Total Fee To Be Reimburse |
|---|---|---|---|
| 78 | 3224 | Leela Education Society, G.V. Acharya Institute of Engineering and Technology, Shelu, Karjat | 1444370 |
| 79 | 3225 | Saraswathi Vidya Bhavan's College of Pharmacy, Dombivli | 465244 |
| 80 | 3226 | Mumbai Educational Trust's Institute of Pharmacy, Mumbai | 200196 |
| 81 | 3228 | SVKM's Dr. Bhanuben Nanavati College of Pharmacy, Mumbai | 203436 |
| 82 | 3229 | Dr. L. H. Hiranandani College of Pharmacy ,Ulhasnagar | 482092 |
| 83 | 3230 | NCRD's Sterling Institute of Pharmacy, Navi Mumbai | 187422 |
| 84 | 3231 | Oriental College of Pharmacy , Navi Mumbai | 633517 |
| 85 | 3232 | Yadavrao Tasgaonkar Institute of Pharmacy,Chandhai, Bhiv-puri Road Station, Tal-Karjat | 129910 |
| 86 | 3233 | Govindrao Nikam College Of Pharmacy, Sawarde | 152893 |
| 87 | 3234 | Maharashtra Education Society's H.K. College of Pharmacy, Jogeshwari, Mumbai | 503600 |
| 88 | 3235 | Gahlot Institute of Pharmacy, Koparkhairane, Navi Mumbai | 333642 |
| 89 | 3236 | Konkan Gyanpeeth Rahul Dharkar College of Pharmacy & Research Institute, Karjat, Dahivali, Karjat Dist. Raigad | 269533 |
| 90 | 3237 | Vivekanand Education Society's College of Pharmacy, Chembur, Mumbai | 328232 |
| 91 | 3238 | Adarsh Shikshan Prasarak Mandal's Ideal College of Pharmacy & Research, Ambernath | 134545 |
| 92 | 3239 | Prabhodhan Shikshan Prasarak Sanshta's Indira Institute of Pharmacy, Sadavali | 148029 |
| 93 | 3240 | Aldel Education Trust's St. John Institute of Pharmacy and Research, Vevoor, Palghar | 588366 |
| 94 | 3241 | Vighnarta Trust, Shivajirao Jondhale College of Pharmacy, Shahapur | 261185 |
| 95 | 3242 | The Shri Rishikesh Shikshan Prasarak Mandal, D.D.Vispute College of Pharmacy & Research Centre, Devad, New Panvel, Raiga | 245428 |
| 96 | 3244 | Bharati Vidyapeeth's College of Architecture, Belapur, New Mumbai | 45995 |

| Sr.No. | Institute Code | Institute Name | Total Fee To Be Reimburse |
|---|---|---|---|
| 97 | 3245 | Mahatma Education Society's Pillais College of Architecture, New Panvel | 157272 |
| 98 | 3247 | Kamla Raheja Vidhyanidhi Institute for Architecture and Environmental Studies, Mumbai | 53333 |
| 99 | 3248 | Late Baliram Hiray S.S. Trust's Dr.Baliram Hiray College of Architecture, Mumbai | 99399 |
| 100 | 3255 | Mandar Education Society's Rajaram Shinde Institute of Engineering and Technology, Pedhambe | 148759 |
| 101 | 3256 | Bharati Vidyapeeth's Institute of Technology, New Mumbai | 2223894 |
| 102 | 3257 | Vidya Prasarak Mandal's Polytechnic, Thane | 1200141 |
| 103 | 3258 | Agnel Polytechnic (Fr. Agnel Charities) , Vashi, Navi Mumbai | 1949228 |
| 104 | 3260 | Khalapur Taluka Shikshan Prasarak Mandal's, B.L. Patil Polytechnic, Khopoli, Dist.Raigad | 403745 |
| 105 | 3262 | Vidyavardhini's Bhausaheb Vartak Polytechnic, Vasai,Thane | 361752 |
| 106 | 3263 | Smarth Samaj's S. H. Jondhale Polytechnic, Dombivli | 1075521 |
| 107 | 3264 | Sahyadri Shikshan Sanstha's Sahyadri Poly.Sawarde(Ratnagiri) | 488142 |
| 108 | 3267 | Sai Shiva Education Trust's, Muchhala Polytechnic,Thane | 362628 |
| 109 | 3268 | Samarth. Samaj's. Shivajirao S. Jondhale Polytechnic, Ambarnath, Mumbai | 898420 |
| 110 | 3270 | Maratha Mandir's Babasaheb Gawade Institute of Technology, Mumbai | 153215 |
| 111 | 3272 | Ramrao Adik Education Society's Dr. D.Y.Patil Polytechnic, Nerul | 471863 |
| 112 | 3274 | Vidyalankar Polytechnic,Mumbai | 916968 |
| 113 | 3275 | Kala Vidyamandir Institute of Technology,Mumbai | 329316 |
| 114 | 3277 | Shree Shankar Narayan Education Trust,Pravin Patil College of Diploma Engg. & Technology, Bhayinder (E) Western Rly | 227792 |
| 115 | 3278 | Anjuman-I-Islam's Abdul Razzak Kalsekar Polytechnic,Panvel, Navi Mumbai | 63619 |
| 116 | 3279 | Institute of Printing Technoloy and Research, Panvel | 16509 |

| Sr.No. | Institute Code | Institute Name | Total Fee To Be Reimburse |
|---|---|---|---|
| 117 | 3280 | Shivajirao S. Jondhle Polytechnic, Asangaon, Shahapur.Thane | 1372134 |
| 118 | 3281 | Saraswati Education Society,Saraswati Institute of Technology, Kharghar, New Mumbai | 906886 |
| 119 | 3282 | Saraswati Education Society, Yadavrao Tasgaonkar Polytechnic, Chandha, Nasarapur, Bhivpuri Road Railway | 173293 |
| 120 | 3283 | Mahatma Education Society's, Pillai HOC Polytechnic, Rasayani | 1431012 |
| 121 | 3284 | Prabhakar Patil Education Society's, Polytechnic,Raigad | 116392 |
| 122 | 3285 | Dnyan Prasarak Shikshan Sanstha's, Balasaheb Mhatre Polytechnic,Ambarnath | 30292 |
| 123 | 3286 | Leela Education Society, G. V. Acharya Polytechnic,Shelu, Karjat | 295222 |
| 124 | 3288 | Bhartiya Education/Social Charitable Trust, Sheth Shri Otarmal Sheshmal Parmar College Of Diploma, Raigad | 267858 |
| 125 | 3306 | Kiran Patel Educatin Trust's Sardar Vallabhbhai Patel Polytechnic,Mumbai | 133500 |
| 126 | 3351 | Innovative Engineers & Teachers Education Society's Bharat College of Engineering, Kanhor, Badlapur(W) | 1583900 |
| 127 | 3353 | Dilkap Research Institute Of Engineering and Management Studies, At.Mamdapur, Post- Neral, Tal- Karjat, Mumbai | 2778595 |
| 128 | 3420 | Rajendra Mane Polytechnic, Devrukh, Tal. Sangmeshwar, Dist. Ratnagiri | 428174 |
| 129 | 3421 | VIVA College of Diploma Engg &Tech., At. Bolinj, Virar (W) Dist. Thane | 349828 |
| 130 | 3422 | New Jai Bharat Shikshan Prasarak Mandal?s Shantiniketan Polytechnic, New Panvel | 702865 |
| 131 | 3423 | Shree L.R. Tiwari College of Engineering, Mira Road, Mumbai | 4035312 |
| 132 | 3427 | Mahatma Education Society's Pillai's HOC College of Architecture, Rasayani | 203348 |
| 133 | 3436 | B.R. Harne College of Engineering & Technology, Karav, Tal-Ambernath. | 3930944 |
| 134 | 3439 | Anjuman-I-Islam's Kalsekar Technical Campus, Panvel | 1245595 |
| 135 | 3440 | Metropolitan Institute of Technology & Management, Sukhalwad, Sindhudurg. | 1880355 |

| Sr.No. | Institute Code | Institute Name | Total Fee To Be Reimburse |
|---|---|---|---|
| 136 | 3445 | Vishvatmak Jangli Maharaj Ashram Trust's Vishvatmak Om Gurudev College of Engineering, Mohili-Aghai, Shahpur. | 378576 |
| 137 | 3447 | G.M.Vedak Institute of Technology, Tala, Raigad. | 958756 |
| 138 | 3448 | Gokhale Education Society, Katgara Polytechnic Institute, Bordi. | 12873 |
| 139 | 3449 | S.K.Education Trust, Dr. Manoj A Shete College of Engineering & Technology, Kasara. | 99764 |
| 140 | 3451 | Lokmanya Tilak Institute of Architecture and Design Studies, Kopar Khairane, New Mumbai. | 129999 |
| 141 | 3458 | Smt. Geeta D. Tatkare Polytechnic At Gove, Kolad | 622712 |
| 142 | 3460 | Universal College of Engineering,Kaman Dist. Thane | 2582121 |
| 143 | 3462 | VPM's Maharshi Parshuram College of Engineering, Velneshwar, Ratnagiri. | 615982 |
| 144 | 3463 | Urja Education Society's Aditya Polytechnic, Ratnagiri | 12264 |
| 145 | 3464 | Viva Institute of Pharmacy, Virar(E) | 144936 |
| 146 | 3465 | Ideal Institute of Technology, Wada, Dist.Thane | 629198 |
| 147 | 3466 | Devi Mahalaxmi Polytechnic, Titwala, Kalyan | 245984 |
| 148 | 3467 | Vishwaniketan's Institute of Management Entrepreneurship and Engineering Technology(i MEET), Khalapur Dist Raigad | 2153520 |
| 149 | 3468 | Aditya College of architecture, Borivali (W), Mumbai | 108182 |
| 150 | 3469 | Dalvi Education and charitable trust Maharashtra Polytechnic, Soveli, Tal. Mandangad | 892206 |
| 151 | 3470 | Yashwantrao Bhonsale Polytechnic, Charathe, Sawantwadi | 2039069 |
| 152 | 3471 | New Horizon Institute of Technology & Management(Womens College), Thane | 767043 |
| 153 | 3472 | Thakur School of Architecture, Kandivali | 358955 |
| 154 | 3474 | Ideal Institute of Architecture, Posheri, Vada | 139815 |

| Sr.No. | Institute Code | Institute Name | Total Fee To Be Reimburse |
|---|---|---|---|
| 155 | 3475 | A. P. Shah Institute of Technology, Thane | 3459922 |
| 156 | 3477 | Chhartrapati Shivaji Maharaj Institute of Technology, Shedung, Panvel | 1142003 |
| 157 | 3478 | CTES College of Architecture, Chembur, Mumbai. | 48379 |
| 158 | 3480 | Yashwantrao Bhonsale College of Pharmacy, A/P Charathe, Sawantwadi | 321111 |
| 159 | 3482 | B.R. Harne College of Architecture, Karav, Vangani(W) | 41769 |
| 160 | 3483 | Vishwaniketan College of Architecture, Art & Design, Khalapur | 40760 |
| 161 | 3484 | Smt. K.L. Tiwari College of Architecture, Nalasopara, Palghar | 38273 |
| 162 | 3485 | St. Wilfred's Institute of Pharmacy, Panvel | 31100 |
| 163 | 3487 | Ideal Institute of Pharmacy, Wada | 207741 |
| | Grand Total | | **193214237** |

"परिशिष्ट -अ"

(शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२०८/तांशि-४ दिनांक २१ जून, २०१८ सोबतचे सहपत्र)

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील शिष्यवृत्तीची अनुज्ञेय रक्कम महाविद्यालयांच्या बँक खात्यावर मिळविण्यासाठी महाविद्यालयाने द्यावयाचे बंधपत्र ( Indemnity Bond )

१) श्री सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे अर्जदाराने शिष्यवृत्तीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली सर्व माहिती, त्याच्या कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न, तो सध्या शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, उत्पन्नाचे विहित प्रमाणपत्र इ. तपशिल त्याच्या मूळ कागदपत्रांवरुन पूर्णपणे तपासण्यात आला असून, अर्जात नमूद केलेला तपशिल बरोबर आहे. त्यानुसार,मी.श्री./श्रीमती........................................................................................ ... (प्राचार्याचे नाव) ...................................... या शैक्षणिक संस्थेच्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणुन कार्यरत असून, त्या अधिकारात उपरोक्त विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती मंजूर करण्याकरीता शिफारस करीत आहे

२) मी निम्नस्वाक्षरीत हमी देतो की, अर्जदाराची रक्कम जी महाविद्यालयाकडे/तंत्रनिकेतनाकडे सुपूर्द केलेली आहे, ती ज्या प्रयोजनासाठी दिलेली आहे, त्या विशिष्ट प्रयोजनासाठी त्याचा विनियोग करीन आणि त्याबाबीचे हिशोब ज्या प्राधिकाऱ्याने ही तरतूद सुपूर्द केलेली आहे, त्या प्राधिकाऱ्याकडे नियमितपणे पाठवेन. विद्यार्थी महाविद्यालय/तंत्रनिकेतन सोडून गेल्यास किंवा त्याने अभ्यासक्रमात बदल केल्यास किंवा अन्य कोणत्याही अनियमिततेमुळे त्याचा प्रवेश रद्द झाल्यास, त्यास मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्तीची रक्कम सरकारी लेख्यात जमा झाल्याशिवाय त्याचा महाविद्यालय सोडल्याचा दाखला जारी करणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य या नात्याने माझ्याकडे राहिल.

३) विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली माहिती. अर्जदाराने दिलेल्या मूळ कागदपत्राचे आधारे मी तपासलेली आहे. तसेच अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती तपासलेल्या असून सादर केलेल्या कागदपत्रामध्ये कोणताही बदल, खाडाखोड, दुरुस्ती वा फेरफार आढळून आलेला नाही.

४) मी निम्नस्वाक्षरीत प्रमाणित करतो की, अर्जदार हा आमचे महाविद्यालय/तंत्रनिकेतनमधील नियमित विद्यार्थी आहे. त्याने कोणत्याही अन्य महाविद्यालय/तंत्रनिकेतनामध्ये प्रवेश घेतलेला नाही, तसेच त्याची सरासरी उपस्थिती निर्धारित केल्याप्रमाणे आहे. तसेच सदर विद्यार्थ्याकडून महाविद्यालय/तंत्रनिकेतनाने कोणतीही शिक्षण शुल्कापोटी रक्कम घेतलेली नाही.

५) आमचे महाविद्यालय/तंत्रनिकेतन हे मान्यता प्राप्त आहे, ते अनुदानित / विनाअनुदानित आहे, मान्य झालेले अभ्यासक्रम हे संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यानी मान्यता दिलेले आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ही सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या मान्यतेनुसारच असून, त्या प्रवेशक्षमतेच्या अधिन राहून

पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधीत सक्षम कार्यालयास पाठविलेले आहेत. त्यांचे शिक्षण शुल्क संबंधीत सक्षम प्राधिकरण/विद्यापीठ यांनी मान्य केल्याप्रमाणेच असून ती अवास्तव किंवा अवाजवी नाहीत. शासन/ विद्यापीठ/ सक्षम प्राधिकारी यांचे प्रचलित नियम व अटी यांचे पालन करुन व त्यामधील नियम, अटी व शर्तींच्या अधिन राहून विद्यार्थ्यांचा अर्ज योग्य व नियमानुसार असून, त्याची शिष्यवृत्तीची देय रक्कम, महाविद्यालय/तंत्रनिकेतनाच्या बँक खात्यावर जमा होणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. त्यामध्ये अनियमितता, उणीवा व गैरप्रकार झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही महाविद्यालय/तंत्रनिकेनाची असेल.

जावक क्रमांक ...................

दिनांक .......................

ठिकाण ..........................

प्राचार्यांची स्वाक्षरी .................

संपूर्ण नाव ............................

महाविद्यालयाचा शिक्का

संस्थेचे नांव व पत्ता व दुरध्वनी क्रमांक (लेटर हेडवर)

प्रती,
सहसंचालक ,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय ,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
नागरिक बँक इमारत , पहिला माळा,
वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०० ०५१ .

विषय :- आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी हमीपत्र व ॲडव्हान्स स्टॅम्प रिसीट पाठविणेबाबत……………………………………

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास सादर करण्यात येते की, आपल्या कार्यालयाकडून आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रतिपूर्तीसाठी वितरीत करण्यात येत असलेल्या रकमेसाठीचे या संस्थेचे खालील प्रमाणे हमीपत्र आपणास सादर करीत आहे. तसेच सोबत ॲडव्हान्स स्टॅम्प रिसीट जोडून पाठवित आहे.

## हमीपत्र

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन संस्थेस प्राप्त रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये ईसीएस प्रणालीद्वारे जमा करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र १५ दिवसाचे आत सादर करण्याची हमी याद्वारे घेत आहे.

कृपया रक्कम संस्थेच्या सोबत जोडलेल्या खात्यामध्ये जमा करण्यात यावी , ही विनंती.

आपला,

संस्थाप्रमुखाची सही / पदनाम
संस्थाप्रमुखाचे नांव

## ॲडव्हान्स स्टॅम्प रिसीट

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचे कडून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासविद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीकरीता रक्कम रुपये …………… (अक्षरी रूपये………………………………………………………………) संस्थेस प्राप्त झाली .

रिव्हेन्यु स्टॅम्प व स्वाक्षरी
संस्थाप्रमुखाची सही / पदनाम
संस्थाप्रमुखाचे नांव

## संस्थेचे नांव व पत्ता व दुरध्वनी क्रमांक (लेटर हेडवर )

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२०१०/प्रक्र६८/कोषा/प्र-५ दि. १८ एप्रिल,२०११ चे सहपत्र

<u>जोडपत्र - अ</u>

<u>ई सी एस /एन ई एफ टी द्वारे प्रदाने प्राप्त करण्यासाठीचा तपशील</u>

१ मागणीदार/पुरवठादार /कंत्राटदाराचे
नांव / फर्मचे नांव / संस्थेचे नांव

२ कार्यालयाचे नाव व पत्ता (ज्या प्रकरणी लागू आहे)

३ बँक खाते क्रमांक

४ बँक खात्याचा प्रकार

५ बँकेचे नांव

६ बँक शाखेचे नाव व पत्ता

७ बँक शाखेचा संकेतांक

८ एम आय सी आर क्रमांक

९ आय एफ एस सी संकेतांक

दिनांक

कंत्राटदार /पुरवठादार /मागणीदाराची सही

---

बँकेचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की , वरील माहिती मी तपासून पाहिली असून ती योग्य आहे

शाखा प्रमुख

(बँक शाखेचे नाव व शिक्का)

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याबाबत उपाय-योजना.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२०८/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २१ जून, २०१८

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: टीईएम-२०१६/ ५५९/तांशि-४, दिनांक १५/०४/२०१७
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०१७/ ३३२/तांशि-४, दिनांक ७/१०/२०१७
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.४६५/तांशि-४, दिनांक १४/०२/२०१८
४) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/न्याप्र/२०१८/१८४, दिनांक १४/०५/२०१८
५) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक इबीसी- २०१७/प्र.क्र.५२४/शिक्षण-१, दिनांक १७/०५/२०१८

प्रस्तावना:

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना" या योजनांतर्गत पात्र विद्यार्थ्यांना लाभ देण्याकरीता अर्ज करण्यापासून ते रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केलेल्या राज्य स्तरीय महाडीबीटी पोर्टलवर करण्यासंदर्भात उपरोक्त संदर्भ क्र.०२ येथील दिनांक १५.०४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अनिवार्य करण्यात आले आहे.

२. तथापि सदर महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी अर्जाची नोंद केल्यानंतर त्यांना अदा करावयाचे लाभ प्रदान करण्याबाबतची ऑनलाईन प्रक्रिया महाडीबीटी मार्फत प्रगतीत असल्याने पात्र विद्यार्थ्यांस सदर योजनेअंतर्गत लाभाची रक्कम मिळण्यात अडचण येत होत्या. त्यामुळे उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना" आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्तीच्या इतर योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्यांची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे, परंतु संबंधीत योजनेच्या लाभाची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्नित बँक खात्यात थेट जमा

करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील दिनांक १४/२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

३. परंतु सन २०१७-१८ हे शैक्षणिक वर्ष संपुष्टात आल्याने या वर्षातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपरोक्त शिष्यवृत्तीची रक्कम आता विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा केल्यास व अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांनी सदर रक्कम महाविद्यालयात जमा न केल्यास शैक्षणिक संस्थांचे नुकसान होणार असल्याने, काही शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम थेट महाविद्यालयांना अदा करण्यासंदर्भात उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केल्या होत्या. त्या मधील रिट याचिका क्र. ४०८/२०१८ या याचिकेवर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक १६.०४.२०१८, दिनांक २३.०४.२०१८ व दिनांक २६.०४.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये सन २०१७-१८ मधील महाविद्यालयांतील प्रवेशित सामाजिक मागास प्रवर्गातील व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम अदा करण्यासंबंधी उपाययोजना करण्याचे निदेश मा. उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या दिनांक ३/५/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मागासवर्ग व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण व परीक्षा शुल्काची रक्कम प्राप्त होऊ न शकलेल्या महाविद्यालय-शैक्षणिक संस्थांना केवल सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी काही अटी व शर्तींवर प्रलंबित रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच महाविद्यालयांमधील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांपैकी लाभ देण्यात आलेले विद्यार्थी वगळून, उर्वरित विद्यार्थ्यांच्या पात्र अभ्यासक्रमांसाठी देय असणारी रक्कम ४ आठवड्यात देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील मागास प्रवर्गातील उर्वरित विद्यार्थ्यांची अनुज्ञेय / पात्र अभ्यासक्रमांसाठी देय असणारी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय/ शैक्षणिक संस्थेला ऑफ लाईन पध्दतीने अदा करण्यास मान्यता देण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून शासन निर्णय, क्रमांक ईबीसी-२०१७/ प्र.क्र.५२४/ शिक्षण-१, दिनांक १७/५/२०१८ निर्गमित करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची व इतर शिष्यवृत्तींची शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील वितरीत करावयाची उर्वरित रक्कम संबंधित शैक्षणिक संस्थांना पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे थेट वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये ज्या महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व इतर शिष्यवृत्तींची रक्कम अद्याप प्राप्त होऊ शकलेली नाही, अशा महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शैक्षणिक संस्थांना, त्यांच्याकडील प्रवेशित पात्र

आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी आज अखेर लाभ अदा केलेले विद्यार्थी वगळून, उर्वरित पात्र विद्यार्थ्यांची देय असणारी शिष्यवृत्तीची रक्कम संबंधीत महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शैक्षणिक संस्थेला पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे थेट स्वरूपात अदा करण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे :-

१) विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम संस्थेला वितरीत करण्याची सदर कार्यपद्धती केवळ शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता लागू राहील.

२) शासनाने विहित केल्याप्रमाणे संबंधीत महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शैक्षणिक संस्थेने त्यांच्याकडील प्रवेशित विद्यार्थ्यांचे परिपूर्ण अर्ज तपासून प्राचार्यांच्या हमीपत्रासह (परिशिष्ट "अ" प्रमाणे) विभागीय सहसंचालकांना सादर करावेत व सहसंचालकांनी तपासून ते यथास्थिती संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहिल. (असे अर्ज प्राचार्यांच्या हमीपत्रासह यापूर्वी सादर केले असतील तर ते पुन्हा सादर करण्याची आवश्यकता नाही.)

३) प्रत्येक पात्र विद्यार्थ्यांची आधार व्हेरिफिकेशन झाले असल्याचे संबंधीत महाविद्यालयाने प्रमाणित करावे.

४) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये संबंधीत पात्र विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क घेतलेले नसल्याचे हमीपत्र संबंधीत महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शैक्षणिक संस्थेने विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

५) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये संबंधीत महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शैक्षणिक संस्थेने सादर केलेल्या अर्जाची संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तपासणी करुन ज्या विद्यार्थ्यांना लाभ अदा केलेले आहेत, असे विद्यार्थी वगळून उर्वरित पात्र विद्यार्थ्यांची देय होणारी शिष्यवृत्तीची रक्कम संबंधीत संबंधीत महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शैक्षणिक संस्थेस ४ आठवड्यात अदा करावी.

६) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील परीक्षा शुल्काची रक्कम विद्यार्थ्यांनी संबंधित विद्यापीठे/मंडळे यांच्याकडे जमा केली असल्याने शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काची रक्कम संबंधीत महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शैक्षणिक संस्थेने विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावी.

२. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांची निर्वाह भत्याची रक्कम संबंधीत विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यावर पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे थेट जमा करण्यात यावी.

३. प्रस्तुत शासन निर्णयापूर्वी तंत्र शिक्षण संचालनालय व उच्च शिक्षण संचालनालयाच्या संबंधीत विभागीय सहसंचालकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांपैकी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी लाभ दिलेल्या विद्यार्थ्यांचा तपशिल तात्काळ संबंधीत संबंधीत महाविद्यालय/तंत्रनिकेतने/शैक्षणिक संस्थांना अवगत करावा.

४. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम अदा केली जाईल, ती या शैक्षणिक वर्षात यापूर्वी संबंधीत विद्यार्थी वा महाविद्यालयाला दिलेली नाही, तसेच अशा विद्यार्थ्यांना वा महाविद्यालयांना त्याच कालावधीसाठी ती पुन्हा दिली जाणार नाही. तसेच शिष्यवृत्ती योजनेंतर्गत दुबार लाभ प्रदान होणार नाही, याबाबत संबंधित संचालक व विभागीय सहसंचालकांनी दक्षता घ्यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०६२११५०७३५१६०८ असा आहे. सदरचे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sanjay A. Dharurkar

( संजय धारुरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव (प.दु.म.), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, सामाजिक न्याय व विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
१०. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
११. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य